<u>सं.फौ.ख.क्र.७१३/२०२१</u>
शासन–वि–किरण रांधवन.
नि.क्र.१४ लगत.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांची जबानी**

मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नाव – रेखा सोपान आटोळे,
वय – ४० वर्षे, व्यवसाय – घरकाम,
राहणार– रावणगाव, ता. दौंड, जि. पुणे.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आधंळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–**

१. चंद्रभागा माझी आई आहे. घटना ही चार वर्षापूर्वी माझी आई पोटात दुखत असल्यामुळे दवाखान्यात जात असताना आरोपी किरण त्याच्या मोटारसायकलवरुन मोबाईल फोनवर बोलत समोरुन सर्वीस रोडवरुन आला आणि त्याने माझ्या आईला धडक दिली व तेथून निघून गेला. त्यानंतर मी माझ्या आईला गावातील दवाखान्यात घेऊन गेले. गाडीचा नंबर चार वर्षे झाल्यामुळे आठवत नाही. आरोपीला पाहिल्यास ओळखू शकते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे. साक्षीदाराने आरोपीला ओळखले आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. जे. के. थोरात यांच्यामार्फतः–**

२. मला लिहीता वाचता येत नाही. मी घरकाम करते. माझे लग्न झालेले आहे. मी राहायला माझ्या माहेरी रावणगाव येथे असते. अपघात घराजवळ झाल्यामुळे मला लगेचच कळाले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई आधापासून आजारी होती. हे म्हणणे खरे आहे की, घटना चार वर्षापूर्वी घडली होती. मी आईच्या मागे चालत होते जेव्हा अपघात झाला. आईला उपचार केल्याबाबतचे कागदपत्र माझ्याकडे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत. समक्ष

Sd/–

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

दिनांकः– १७.०५.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.